महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक कार्यालय जालना
जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, अंबड रोड जालना

फोन : 02482-225601, फॅक्स : 02482-225352 ई-मेल : sp.jalna@mahapolice.gov.in

# प्रेस नोट

पोलीस अधीक्षक, जालना यांचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई (102) पदे व पोलीस शिपाई चालक (23) पदे अशी एकुण (125) पदे भरणे करीता पोलीस भरती 2022-2023 च्या भरतीची जाहिरात दिनांक 01/03/2024 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. उमेदवार यांनी त्यांचे पोलीस भरतीचे ओळखपत्र (Admit Card) **policerecruitment2024.mahait.org** या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन घेण्यात यावे. तसेच उमेदवाराने ऑनलाईन काढलेला फॉर्म,ऑनलाईन प्रवेशपत्र,आधार कार्ड,मतदानकार्ड, ड्रायव्हींग लायसन्स,पॅनकार्ड, १० व १२ वी पास प्रमाणपत्र,रहिवाशी (डोमासाईल),जात प्रमाणपत्र/जातवैधता/ नॉनक्रिमिलेअर/खुल्या प्रवर्गातील महिलासाठी ३०% आरक्षणाचे प्रमाणपत्र EWS/SEBC/ प्रकल्पग्रस्त/ भुकंपग्रस्त/पोलीस पाल्य/होमागार्ड/अंशकालीन पदवीधर/खेळाडु/ अनाथ/संगणक प्रमाणपत्र/हलके वाहन चालविण्याचा परवाना व ०५ पासपोर्ट साईज फोटो **इत्यादी मुळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे व त्यांच्या छायांकित प्रती सोबत आणाव्यात.**

जालना जिल्हा पोलीस घटकाकरिता पोलीस शिपाई पदासाठी 4071 व पोलीस शिपाई चालक पदासाठी 2907 असे **एकुण 6978** आवेदन अर्ज प्राप्त झाले आहेत. सदर पोलीस भरती प्रक्रिया दिनांक 19/06/2024 रोजी सकाळी 4.30 वा.पासुन पोलीस परेड मैदान,सर्वे नं.४८८ जालना येथे सुरु होणार असुन पोलीस भरती करिता एकुण **6978** उमेदवार हजर राहणार आहेत.

तसेच पोलीस भरती करिता पोलीस उप अधीक्षक -04,पोलीस अधिकारी- 29, पोलीस अंमलदार 170 व मंत्रालयीन कर्मचारी 47 **असे एकुण** 250 भरती प्रक्रिया बंदोबस्त कामी नेमण्यात आलेले आहेत.

उमेदवारांना सुचीत करण्यात येते की, पोलीस भरती-2022-2023 ची प्रक्रिया पार पाडताना सीसीटीव्ही कॅमेरा, व्हीडिओ,चित्रीकरण तसेच अत्याधुनिक डिजीटल यत्रणांचा वापर करुन अत्यंत पारदर्शक पध्दतीने भरती करण्यात येणार आहे. त्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही उमेदवारांनी गैरप्रकार करण्याचा प्रयत्न करु नये, असे अवाहन करण्यात येत आहे. पोलीस भरती मध्ये काही लोक(दलाल) भरतीत निवड करण्याचे प्रलोभन दाखवुन उमेदवारांची दिशाभुल करुन उमेदवारांकडे पैशांची मागणी करण्याची शक्यता नाकारता येत नाही. उमेदवारांनी अशा अमिषाला बळी न पडता याबाबत काही निदर्शनास आल्यास किंवा कोणी पैशाची मागणी केल्यास खालील दुरध्वनीद्वारे/व्हॉटसअप क्रमांकावर तात्काळ संपर्क साधावा.

| अ.क्र. | संपर्क कार्यालय | दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| 1) | पोलीस उप अधीक्षक(मु.)जालना | 9922799027 |
| 2) | लाचलुचपथ प्रतिबंधक विभाग,जालना | 02482-220252<br>टोल फ्रि क्रमांक 1064 |
| 3) | पोलीस नियंत्रण कक्ष,जालना<br>पोलीस नियंत्रण कक्ष,जालना<br>पोलीस नियंत्रण कक्ष जालना<br>(whatsapp number) | 02482-225100,<br>02482-224833<br>9604161100<br>9604121100 |
| 4) | पोनि स्थानिक गुन्हे शाखा | 8552817101 |

**(अजय कुमार बंसल)**
पोलीस अधीक्षक,जालना

AnyScanner

दिनांक 16/06/2024

प्रेस नोट

महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील रिक्त पदे भरणे साठी मैदानी चाचणी परीक्षा दिनांक १९/०६/२०२४ पासून संपूर्ण राज्यभर सुरु होणार आहे. उमेदवारांना विविध पदांकरिता (पोलीस शिपाई, चालक , बँडसमन, सशस्त्र पोलीस शिपाई, तुरुंग विभाग शिपाई) एका घटकात किंवा वेगवेगळ्या घटकांत अर्ज करता येतात. त्यानुसार काही उमेदवारांना एकाच दिवशी अथवा लागोपाठचे दिवशी दोन पदांकरिता मैदानी चाचणी साठी हजर राहणे बाबत ची स्थिती निर्माण होवू शकते व त्यामुळे काही उमेदवरांची गैरसोय होवू शकते. म्हणून सर्व घटक प्रमुखांना व Mahait विभागास सूचना देण्यात आली आहे की, ज्या उमेदवारास एकच वेळी दोन पदांकरिता मैदानी चाचणीस हजर राहणे साठी सूचना दिली असेल असा उमेदवार पाहिल्या ठिकाणी हजर राहिल्या नंतर त्या उमेदवारांना दुसरी ठिकाणी वेगळी तारीख देण्यात यावी. दुसऱ्या ठिकाणचे घटक प्रमुखांनी अशा उमेदवारांची मैदानी चाचणी घ्यावी. तसेच मैदानी चाचणी ची पहिली तारीख आणि दुसरी तारीख यामध्ये किमान ४ दिवसांचे अंतर असावे. मात्र या करिता उमेदवार पहिल्या मैदानी चाचणीस हजर होता याचे लेखी पुरावे दुसऱ्या मैदानी चाचणी वेळी सादर करावे लागतील. “पोलिस भरती २०२२-२३ मधे ज्या उमेदवारांनी एका पेक्षा जास्त पदांकरिता अर्ज केले आहेत आणि त्यांची मैदानी चाचणी एकाच दिवशी आली असेल अश्या उमेदवारांना किमान ४ दिवस अंतराने वेगवेगळ्या तारखा दिल्या जातील. उमेदवारांना अडचण / शंका असल्यास त्यांनी raunak.saraf@mahait.org यावर ईमेल करावा”

अपर पोलीस महासंचालक,
प्रशिक्षण व खास पथके,
महाराष्ट्र राज्य मुंबई

SCAN AnyScanner